झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे-१६.

जा.क्र.झोपुप्रा/सप्रा/प्र.क्र.१७१/झोनिआ/ 2९ /२०१९

दिनांक :-२० /०९/२०१९

# "झोपडपट्टी निर्मूलन आदेश"

ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे **'उक्त अधिनियम'** असा करणेत येत आहे.) चे कलम ३ अ (१) (२) अन्वये महाराष्ट्र शासनाने, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१ दि. ३०/०६/२००५ अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना या प्राधिकरणाकडून तयार करणेत आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या मंजुरीने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.०१/१२/२००५ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, स.नं.२९६/अ/१/४/२, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे क्षेत्र ११७०.०० चौ.मी. या विकसक मे.यश प्रॉपर्टीज यांचे मालकीच्या क्षेत्रावर पुनर्वसन करून झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी उक्त विकसकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे पुनर्वसन प्रस्ताव दाखल केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (वाय) मधील तरतूदीनुसार झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपडीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम यादी (परिशिष्ट - २) तयार करण्याचे अधिकार उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्‌टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना प्रदान केलेले आहेत. त्याअनुषंगाने उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांनी अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील झोपडपट्‌टीचे सर्व्हेक्षण करुन झोपडीधारकांची पात्रता यादी (परिशिष्ट-२) दि.०७/०१/२०१९ रोजी निश्चित केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट-२ नुसार सदर जमिनीवर एकूण ६५ झोपडया असून त्यापैकी पात्र निवासी ४५, पात्र बिगर निवासी ८ या प्रमाणे एकुण ५३ झोपडीधारक पुनर्वसनास पात्र ठरले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एकुण झोपडयांची संख्या | | ६५ |
| २. | निवासी | एकुण झोपडयांची संख्या | ५१ |
| | | एकुण पात्र झोपडयांची संख्या | ४५ |
| | | एकुण अपात्र झोपडयांची संख्या | ६ |
| ३. | बिगरनिवासी | एकुण झोपडयांची संख्या | १२ |
| | | एकुण पात्र झोपडयांची संख्या | ८ |
| | | एकुण अपात्र झोपडयांची संख्या | ४ |
| ४. | मंदीर | | १ |
| ५. | शौचालय | | १ |

उपरोक्त पात्र झोपडीधारकांपैकी ९८.११% झोपडीधारकांनी विकसक मे.यश प्रॉपर्टीज यांना पुनर्वसनास संमती दिलेली आहे;

आणि ज्याअर्थी, स.नं.२९६/अ/१/४/२, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे क्षेत्र ११७०.०० चौ.मी. ही मिळकत झोपडपट्टी पुनर्वसन आदेश उक्त अधिनियमाचे कलम ३ (क) अन्वये दि.२७/०७/२०१८ नुसार पारित करणेत आला आहे आणि सदर आदेश स्थानिक वृत्तपत्रात दै.लोकसत्ता दि.३०/०७/२०१८ रोजी आणि महाराष्ट्र शासन राजपत्र दि.०२/०८/२०१८ ते दि.०८/०८/२०१८ रोजी, प्रसिध्द करण्यात आला आहे.त्याचप्रमाणे हा ३ क आदेश दि.३०/०७/२०१८ रोजी झोपडपट्टी क्षेत्रातील जागेवर डकविण्यात आला आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूचीमध्ये नमुद केलेल्या क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश विहीत पध्दतीने प्रसिध्द झाला असुन विहीत कालावधीत कोणाचीही हरकत प्राप्त झालेली नाही व शिखर तक्रार निवारण समिती अथवा कोणत्याही न्यायालयाचा स्थगनादेश नाही. सबब 'झोपडपट्टी पुनर्वसन योजना' राबविणेकामी झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील इमारती / झोपडया पाडून जमिन खुली करणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महराष्ट्र शासनाने महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम १९७१ या मध्ये सन २०१८ च्या महा. ३८ या अधिनियमान्वये सुधारणा करुन उक्त अधिनियम दि. २६/०४/२०१८ अंमलात आला असल्याने उक्त अधिनियमातील सुधारित कलम ३ ड अन्वये पुढील कार्यवाही करणे अनिवार्य आहे ;

त्याअर्थी, मी राजेंद्र निंबाळकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे उक्त अधिनियमाचे (सुधारणा अधिनियमामधील तरतुदीनुसार) कलम ३ ड सह १२ (१) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचीमध्ये नमुद केलेले क्षेत्र ११७०.०० चौ.मी. हे 'झोपडपट्टी निर्मूलन क्षेत्र' म्हणुन घोषित करीत आहे आणि पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे.

i) उक्त क्षेत्रामधील प्रत्येक झोपडी व बांधकाम या मधील झोपडीधारकांनी त्यांची झोपडी ३० दिवसांचे आत रिकामी करून विकसकाच्या ताब्यात दिली पाहिजे.

ii) अशा रितीने रिकामी झालेली झोपडी / बांधकाम, उक्त विकसकाने या आदेशाचे दिनांकापासून ५० दिवसाचे आंत पाडून टाकून जमीन खुली केली पाहिजे.

सदरचा आदेश हा खालील अटींवर देणेत येत आहे.

१. सदर आदेशापासून किमान ५० दिवसांच्या आंत विकसकाने निर्मूलन करून क्षेत्र खाली केले पाहिजे.
२. सदर आदेशापासून तीन महिन्याच्या मुदतीच्या आत विकसकाने योजनेचे नकाशे मंजुर करुन प्रत्यक्ष बांधकाम सुरु केले पाहिजे.
३. विकसकाने योजनेचे काम चालु करणेपूर्वी विस्थापित होणा-या पात्र लाभार्थींची राहणेची तात्पुरती पर्यायी व्यवस्था आवश्यक त्या सर्व सुविधांसह स्व:खर्चाने केली पाहिजे.
४. विकसकाने पुनर्वसन घटकाच्या इमारतीचे बांधकाम दोन वर्षात सोई सुविधांसह पूर्ण केले पाहिजे.
५. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर व इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यानंतर एक महिन्यात विकसकाने सदनिकांचा / गाळयांचा ताबा लाभार्थींना दिला पाहिजे.
६. वाजवी व सबळ कारणामुळे इमारतीच्या बांधकामास विलंब झालेस मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा., पुणे यांचे निदेशानुसार विलंब कालावधीसाठी दंड आकारुन मुदतवाढ देण्यात येईल.

७. विकसकाने योजनेच्या बांधकामाची गुणवत्ता राखण्यात कसूर केल्यास अगर बांधकामाची प्रगती समाधानकारक नसलेस विकसकावर उपरोक्त अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कारवाई करण्यात येईल.

८. पात्र लाभार्थ्यांना पुनर्वसन योजनेतील सदनिकांचा / गाळयांचा ताबा दिलेनंतर एक महिन्यात विकसकाने संक्रमण शिबीर रिकामे केले पाहिजे.

९. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे नियमावलीनुसार योजनेतंर्गत आवश्यक ती सर्व कामे विकसकाने करणे बंधनकारक राहील.

सदरच्या आदेशामुळे बाधित होणा-या कोणत्याही व्यक्तीस अथवा झोपडीधारकास आदेश प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत उक्त अधिनियमाच्या कलम ३ ड सह १२ (४) अन्वये शिखर तक्रार निवारण समिती, महाराष्ट्र शासन, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, अनंत काणेकर मार्ग, स्टेशन रोड, बांद्रा (पुर्व), मुंबई -४०००५१ यांचेकडे अपिल दाखल करता येईल आणि उक्त अपिलावरील शिखर तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

## अनुसूची

| जमिनीचा तपशील | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा |
|---|---|---|
| स.नं.२९६/अ/१/४/२, शेवकर वस्ती, हडपसर, पुणे | ११७०.०० चौ.मी | **पुर्वेस** - रस्ता व लागु स.नं.२९६(पै.) |
| | | **पश्चिमेस** - रस्ता (१२ मी. डी.पी रस्ता) व लागु रस्ता स.नं.१२१ |
| | | **उत्तरेस** - रस्ता (१२ मी. डी.पी रस्ता) |
| | | **दक्षिणेस** - रस्ता (१८ मी. डी.पी रस्ता) |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

20.9.2019

**(राजेंद्र निंबाळकर)** (भा.प्र.से)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

**स्थळ :-** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
**दिनांक :-**२०/०९/२०१९

प्रत :- विकसक मे.यश प्रॉपर्टीज अॅण्ड डेव्हलपर्स, कोंढवे-धावडे, एन.डी.ए. रोड, पुणे-२३
विहित मुदतीत सदरचे योजनाक्षेत्र खुले करुन या कार्यालयात लेखी अवगत करावे जेणेकरुन बांधकामाचे कार्यारंभ आदेश देणेत येतील.

35.00